Exh.8

मनपा शाळांची सभापतींकडून अचानक पाहणी; शैक्षणिक व भौतिक सुविधांचा घेतला आढावा

जनप्रवास : इचलकरंजी

महानगरपालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण समितीने सक्रिय पावले उचलली आहेत. याचाच भाग म्हणून शिक्षण समितीच्या सभापती विद्या साळुंखे व उपसभापती पूनम माळी यांनी शहरातील विविध मनपा शाळांना अचानक भेट देऊन तेथील सुविधांची पाहणी केली.

या भेटीदरम्यान त्यांनी हुतात्मा बाबू गेनू विद्यालय (क्र. २८), रवींद्रनाथ टागोर विद्यानिकेतन (क्र. २७), छत्रपती संभाजी विद्यामंदिर (क्र. ३५) आणि बालकृष्ण बुवा विद्यामंदिर (क्र. ७) येथे प्रत्यक्ष वर्गात जाऊन अध्यापन प्रक्रिया, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि उपलब्ध शैक्षणिक साधन सामग्रीची खातरजमा केली. अध्यापन अधिक परिणामकारक व आधुनिक व्हावे यासाठी शिक्षकांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचे आवाहन सभापतींनी केले.

पाहणी दरम्यान काही शाळांमध्ये अपुऱ्या वर्गखोल्या, डिजिटल लॅबचा अभाव, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, स्वच्छतागृहांची दुरवस्था आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज अशा विविध समस्या प्रकर्षाने निदर्शनास आल्या.

या सर्व त्रुटी प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. यामध्ये शाळांमध्ये संगणकांची संख्या वाढवणे, स्वतंत्र डिजिटल कक्ष उभारणे, शिक्षकांना तांत्रिक प्रशिक्षणासह एमएससीआयटी पूर्ण करण्यास प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच जीर्ण इमारतींची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम आणि पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर यंत्रणा बसवण्यासाठी संबंधित विभागांनी तातडीने प्रस्ताव सादर करावेत, असे आदेशही त्यांनी दिले.

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेत गैरप्रकाराची १८ प्रकरणे

- शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील ९८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत; कोल्हापूर १०, सांगली ४ आणि सातारा ४ गैरप्रकाराची नोंद

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून सुरळीतपणे सुरू झालेल्या आहेत. दरम्यान, ९ एप्रिल रोजी भरारी पथकाकडून १८ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झाली.

गुरुवार, ९ एप्रिल रोजी बी. ए., बी. कॉम, बीएस्सी, एमबीए अशा विविध ९८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १९९ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ७३८६३ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. ९ एप्रिल रोजी सदर पथकाकडून कोल्हापूर १०, सांगली ४ व सातारा ४ अशा एकूण १८ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. दरम्यान, परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. भारुड यांचे बनावट व्हॉट्स ॲप अकाउंट

कोल्हापूर : कोल्हापूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांच्या फोटोचा वापर करून खाजगी व्हॉट्स ॲप अकाउंटवरून मेसेज फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे अकाउंट आयुक्तांचे अधिकृत अकाउंट नसून त्यावरून येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या संदेशांना अथवा प्रलोभनाला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिकेकडून कळविले आहे की, कोणीही अशा खोट्या अकाउंटवरून फिरणारे मेसेज व्हायरल करू नयेत तसेच कोणत्याही प्रकारच्या आर्थिक अथवा इतर मागणीस प्रतिसाद देऊ नये. महापालिकेचा अधिकृत संपर्क क्रमांक ९७६५३२००१ असा आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय सेवा शुल्कात वाढ; स्थायी समितीच्या सभेत मंजुरी

कोल्हापूर : कोल्हापूर महापालिका वैद्यकीय सेवा शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय स्थायी समितीच्या सभेत करण्यात आला. सभापती विशाल शिराळे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत एकूण ८ प्रस्ताव ठेवले होते. ते आठही प्रस्ताव मंजूर करून ते महासभेकडे सादर केले. या सभेत धनगरवाडा वस्ती रस्ता डांबरीकरण करण्यासाठी निविदा मंजूर केली. सानेगुरुजी वसाहत परिसरातील अंतर्गत रस्ते व गटर्स करण्याच्या सुविधा करण्यासाठी निविदा मंजूर केली.

वस्त्रोद्योग उत्कृष्टता केंद्र उभारणीसाठी निर्णायक पाऊल

- उद्योग, कौशल्य व रोजगाराला चालना : अशोक स्वामी

जनप्रवास : इचलकरंजी

शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत राज्यातील निवडक वस्त्रोद्योग समूहांमध्ये वस्त्रोद्योग उत्कृष्टता केंद्र उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आला असून या संदर्भात ११ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशन हॉल येथे महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली आहे, अशी माहिती वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांनी दिली आहे.

या बैठकीत वस्त्रोद्योग क्षेत्रातील कौशल्यातील तफावत भरून काढणे, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण उपलब्ध करणे व रोजगाराच्या संधी वाढविणे यावर सविस्तर चर्चा होणार आहे. राज्यातील वस्त्रोद्योग अधिक सक्षम व स्पर्धात्मक करण्यासाठी उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून आधुनिक यंत्रसामग्री, संशोधन सुविधा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार असून उत्पादनाची गुणवत्ता वाढण्यास तसेच निर्यात क्षमतेत सुधारणा होण्यास मदत होईल.

बैठकीस विविध महत्त्वाच्या संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून त्यामध्ये प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग सोलापूर, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई, दि इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशन, डीकेटीई इचलकरंजी, सोलापूर गारमेंट्स असोसिएशन, सोलापूर पॉवरलूम असोसिएशन, तसेच दि इचलकरंजी पॉवरलूम विणकर सहकारी संस्था यांचा समावेश आहे. यासोबतच अध्यक्ष *महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघ यांचीही* उपस्थिती अपेक्षित असून या बैठकीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

इचलकरंजी ही राज्यातील प्रमुख वस्त्रोद्योग नगरी असल्यामुळे येथे उत्कृष्टता केंद्र उभारणी झाल्यास उद्योगांना मोठा फायदा होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर, कुशल मनुष्यबळ निर्मिती, उत्पादन खर्चात बचत आणि जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता वाढविणे या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे, असे पत्रकात म्हटले आहे.

जाहीरनामा

तहसिलदार करवीर - कोल्हापूर यांचे कोर्टात.

अर्ज नं. ३८/२०२६

श्री./श्रीमती नजुबाई बाबासो मुजावर, रा. पोस्ट नं. ५५, बोंद्रेनगर, कोल्हापूर ...अर्जदार

विरुद्ध

महापालिका आयुक्त तथा जन्म - मृत्यु निबंधक कोल्हापूर महानगरपालिका जन्म-मृत्यु निबंधक तथा हायपंचायत, ता. करवीर ...वि. प.

जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज

१) ज्या अर्जी खालील श्री./श्रीमती नजुबाई बाबासो मुजावर, रा.पोस्ट नं. ५५, बोंद्रेनगर, कोल्हापूर यांच अर्ज इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअर्जी त्यांनी त्यांचे वडील नाव बाबा जन्म दि. १५/१०/१९६५ रोजी कोल्हापूर येथे झाल्याबाबतची नोंद दि १० ऑक्टोबरला करून जिल्हाधिकारी अजित शिंदे केलेली आहे. यात खरा जन्मची/मृत्यूची नोंद कोल्हापूर महानगरपालिका /कोल्हापूर येथे करायची राहून गेली आहे. २) अर्जदार यांना सदर जन्म / मृत्यू दाखला शासकीय कामी आवश्यक असलेने व खरा जन्मची/मृत्यूची नोंद मृतदाखल्यामध्ये केलेस तहसिलदार करवीर, कोल्हापूर यांचे अहेतानेच संबंधित महानगरपालिका / हायपंचायत येथे नोंद करता येईल असे सांगितल्याने अर्जदार यांना प्रमुतच अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे असे कथन करून अर्ज दाखल केला आहे. ३) त्याअर्जी अर्जदार यांचे अर्जातील मजकूर चुकीचा आहे असे कोणास सांगणे करावयाचे असेल तर प्रस्तुत जाहीरनामा प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत आपा न्यायालयात येवनी तारीख दि. २४/०४/२०२६ इ. रोजी ११.०० वा. या न्यायालयात स्वत. अगर न्यायालयात प्रतिनिधित्व करू शकेन अगर प्रतिनिधीमार्फत सकाळी हजर राहून बाबु मंडळी अगवा अर्जदार यांचे अर्जाचा मुद्दाकडे पूर्ण करून घेण्या तो आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी. आज तारीख ०८/०४/२०२६ इ. रोजी माझे सही, शिक्कानिशी जाहीरनामा दिला आहे.

हुकुमावरून,

सही/- महसूल सहायक, करवीर (शिक्का) सही/- कार्यकारी दंडाधिकारी, करवीर

अर्जदारतर्फे वकील ॲड. जी. के बागरे

जाहीरनामा

मा. सह. दिवाणी न्यायाधिशसा क स्तर राधानगरी (एन. पी. काकडेसो) यांचे कोर्टात.

दि. किरकोळ अर्ज नं. ०५/२०२६

पुढील नेमणी ता. १६/०६/२०२६, नि. ६/१

१) श्री. भानुदास शामराव सुतार, व. व. ५५, धंदा: आरा गिरणी चालवणे, रा. भरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

२) श्रीमती आनंदी शामराव सुतार, व व. ८०, धंदा: घरकाम, रा. सदर. ... अर्जदार

३) श्रीमती रेखा केरबा सुतार, व. व. ४७, धंदा: घरकाम, रा. मिणचे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

४. श्रीमती अलका रमेश लोहार व. व. ४५, धंदा: घरकाम, रा. पिंपळगाव ता. भुदरगड जि. कोल्हापूर.

५) गितांजली शामराव सुतार व व. ४०, धंदा: घरकाम, रा. नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

विरुद्ध

कोणीही नाही ...वि. प.

अर्ज. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ४ प्रमाणे वारसा दाखला मिळणेबाबत.

यातील अर्जदार क्र. १ व ३ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र. २ चे पती शामराव रावु सुतार हे आहेत. ते यातील अर्जदार नं. १ व २ यांचे सोबत नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे राहत होते. ते दि. २३/०८/२०२५ इ. रोजी मयत झाले. सध्या अर्जदार नं. १ व २ हे नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे राहत असून त्यांचा लाकुड खरेदी-विक्री करणे व उभ्या व आडव्या आरा गिरणीव्यतिरिक्त लाकुड कापणी अशा प्रकारच्या व्यवसाय केंद्रनाथ सामिल या नावाने चालू केला होता. अर्जदार क्र. १ व ३ ते ५ यांचे वडील शामराव रावु सुतार यांचे नावे आरा गिरणीवंत्र परवाना क्र. आर २१५/१४ असून ते दिनांक २३/०८/२०२५ इ. रोजी मयत झाले. अर्जदार नं. ३ ते ५ हया त्यांच्या मुली असून त्या विवाहित आहेत. त्या आपल्या सासरी राहतात. अर्जदार क्र. १ व २ यांचे नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे एकत्र कुटुंब असून आरा गिरणी परवाना हा श्री. शामराव रावु सुतार यांचे नावे होता. त्याची मुदत दि. ३१/१२/२०२५ पर्यंत आहे ते मयत असलेने नवीन आरा गिरणी परवाना घेणे आवश्यक आहे. त्याखेरीज सामिल चालवणे अडचणीचे होणार आहे. म्हणून अर्जदार क्र. १ यांनी सामिलचा आरा मशिन परवाना क्र. आर २१५ /१४ हा आपले नावे करणेसाठी उपवनसंरक्षक वनविभाग कोल्हापूर यांचेकडे अर्ज केला असता त्यांनी अर्जदार यांना दिवाणी कोर्टातुन वारसाचा दाखला आणणेस सांगितलेने अर्जदार यांना सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडत आहे. त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे जाहीर करणेत येते की, अर्जदार हे मयत कै. शामराव रा. सुतार यांचे वर नमुद अर्जदार हेच एकमेव वारस नाहीत असे कोणास शाबीत करावयाचे असेल किंवा त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशिर वारस असलेस त्यांनी दि. १६/०६/२०२६ इ. रोजी सकाळी ठिक १०.३० अगर त्यापूर्वी मुद्दीचे दिवसाखेरीस या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे नंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. आज दि. २७ माहे मार्च २०२६ इ. रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

हुकुमावरून,

सही/- क. लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, राधानगरी

जन्म-मृत्यु निबंधक तथा हायपंचायत

हायपंचायत, ता करवीर ...वि. प.

जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज

१) ज्याअर्जी खालील श्री./श्रीमती [illegible] यांचा अर्ज इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअर्जी त्यांनी त्यांचे वडील नाव [illegible] जन्म दि. [illegible] रोजी कोल्हापूर येथे झाल्याबाबतची नोंद दि [illegible] जिल्हाधिकारी [illegible] केलेली आहे. यात खरा जन्मची/मृत्यूची नोंद कोल्हापूर महानगरपालिका /कोल्हापूर येथे करायची राहून गेली आहे. २) अर्जदार यांना सदर जन्म / मृत्यु दाखला शासकीय कामी आवश्यक असलेने व खरा जन्मची/मृत्यूची नोंद मृतदाखल्यामध्ये केलेस तहसिलदार करवीर, कोल्हापूर यांचे अहेतानेच संबंधित महानगरपालिका / हायपंचायत येथे नोंद करता येईल असे सांगितल्याने अर्जदार यांना प्रमुतच अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे असे कथन करून अर्ज दाखल केला आहे. ३) त्याअर्जी अर्जदार यांचे अर्जातील मजकूर चुकीचा आहे असे कोणास सांगणे करावयाचे असेल तर प्रस्तुत जाहीरनामा प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत आपा न्यायालयात येवनी तारीख दि. २४/०४/२०२६ इ. रोजी ११.०० वा. या न्यायालयात स्वत. अगर न्यायालयात प्रतिनिधित्व करू शकेन अगर प्रतिनिधीमार्फत सकाळी हजर राहून बाबु मंडळी अगवा अर्जदार यांचे अर्जाचा मुद्दाकडे पूर्ण करून घेण्या तो आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी. आज तारीख ०८/०४/२०२६ इ. रोजी माझे सही, शिक्कानिशी जाहीरनामा दिला आहे.

हुकुमावरून,

सही/- महसूल सहायक, करवीर (शिक्का) सही/- कार्यकारी दंडाधिकारी, करवीर

वादीतर्फे वकील ॲड. जे. पु. कुलकर्णी

वाद प्रकार मजकी कायमचाई

मध्यम व दिवाणी जव्हाटार कोर्टात

नियमक १.५ अनुसूची एक परिशिष्ट क्र. २

जाहीर समन्स

जयसिंगपूर येथील मा. मध्यमसो, सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात.

रे.क.नं. ५५/२०२६, नि. ४८/डी

बाबासो बापु मगने

रा. रामतवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर ... वादी

विरुद्ध

१. ब - कादर जीवनकुमार उर्फ मारुत रेवाडे

२.क श्री जीवनकुमार उर्फ मारुत रेवाडे

३. वादी क्र. २ ब व २.क वादी अ. पा. क. आई ... प्रतिवादी

२.अ - संगीता मारुत उर्फ जीवनकुमार रेवाडे

रा. बेडर वस्ताहत, चिपरी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

प्रति, प्रतिवादी नं. २ . ब व २.क यांचे करिता अ. पा. क. २. अ संगीता मारुत उर्फ जीवनकुमार रेवाडे यांना न्यायार्थी वादी दादासो बापु मगने, रा. रामतवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचे विरुद्धकोर्टात व तु. कोल्हापूर, पोट तु. व तु. शिरोळ येथे जयसिंगपूर यांचे इडीतील सेरा-मॅनेज मिळकती न्यायाचे जमीन -

रि.स.नं.	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
५०/१	२.५७	४.८१
पो. ख.	२.०१	

यी पुरे नंबरची जमीन यांचेकडे ४ आणे हिस्सेची जमीन यांचे क्षेत्र

	२.१४.२५ आर	१.२०
५०/२	२.५५	४.६१
यी पुरे नंबरची जमीन यांचेकडे ४ आणे हिस्सेची जमीन यांचे क्षेत्र		
	२.१३.७५	१.१७

यांचेकडे व. न. ५० / १ च्या चतुःसिमा-

पूर्वेस - श्री. भूपाल आण्णा मगदुम यांची जमीन, दक्षिणेस - ओढा, दक्षिणेस - रि.स.नं. ५०/१ वैकी श्री. श्रीकांत दत्तात्रय केरबा यांची जमीन, उत्तरेस - रि.स.नं. ५०/२ ची जमीन.

व.नं. ५० / २ च्या चतुःसिमा :- पूर्वेस - श्री. भूपाल आण्णा मगदुम यांची जमीन, दक्षिणेस - ओढा, दक्षिणेस- रि.स.नं. ५०/१ वैकी श्री. श्रीकांत दत्तात्रय केरबा यांची जमीन, उत्तरेस - श्री. मल्लाप्पा नरसाप्पा मगदुम व नरपाल परीसा कर्ने यांची मिळकत. वेगळ्याने कार्यवाही होत नसेनी वादाचे दावेचा विषय आहे. या दावा मिळकतीबाबत वादी यांचे संबंधित लिखीत ॲक्ट क्र. ३८ प्रमाणे दावा कायम मनाईचा व मँडेटरी मनाईचा या न्यायालयात तुमच्या विरुध्द वाद दाखल केला आहे. त्या अर्थी तुम्हाला त्या वादासंबधी जे काही सांगावयाचे असेल ते सांगणेसाठी दि. १०/०६/२०२६ इ. रोजी सकाळी १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा त्यास योग्य त्या मुखत्यार दिल्या आहेत व जे वादासंबधीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होणेसाठी याद्वारे तुम्ह्यावर समन्स बजावणेत येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा आदेश देणेत येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन सादर करावे किंवा त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट सब सेट ऑफ किंवा प्रतिवाद कॉटर क्लेम ज्या दस्तावाद्यावर आधारलेला असेल असे तुमच्या ताबेत किंवा नियंत्रणखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावे आणि तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट दाव्याच्या सेट ऑफ किंवा प्रतिवादीच्या कॉटर क्लेम, पुरावाचे, पुराव्या म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणखाली असलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजाचा विस्तृत असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करून तीं सूची तुमच्या बचावाच्या निवेदनात जोडावी. तुम्हाला याद्वारे समन्स देणेत येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी असे समन्स देणेत येत आहे की, वर नमुद तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तुमच्या पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द करण्यास पात्र ठरेल. आज दि. ०८ माहे एप्रिल २०२६ इ. रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशीदिले.

सही /- क. लि. (शिक्का) हुकुमावरून, सही /- सहा. अधिक्षक

Order-
Seen and filed.
Sd/-
Jt.C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 02/07/2026

अर्जदार

दि. १०/४/२०२६ रोजी जनप्रवास